लोकमत
कोकण, बुधवार, दि. २४ ऑगस्ट २०२२

प्राध्यापक गाथाडेंच्या 'वैभवसंपन्न दोडामार्ग' पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

# दोडामार्गचे 'वैभव - बलस्थान' पुस्तकाद्वारे जगासमोर



वैभवसंपन्न दोडामार्ग पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

लोकमत न्यूज नेटवर्क

दोडामार्ग : आपणास आपल्या वैभवाची, बलस्थानाची जाणीव असेल तरच आपण आपला आणि आपल्या परिसराचा विकास करू शकतो. म्हणून दोडामार्गचे वैभव आणि बलस्थान जगासमोर आणण्याचे काम वैभवसंपन्न दोडामार्ग या पुस्तकाद्वारे प्रा.डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी अतिशय मेहनत आणि प्रामाणिकपणे केले आहे. त्याचे स्वागत सर्वस्तरातून झाले पाहिजे, असे प्रतिपादन गोव्यातील पर्यावरणतज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर यांनी केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी लिहिलेल्या 'वैभवसंपन्न दोडामार्ग' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. राजेंद्र केरकर, रमेश गावस, दोडामार्ग नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शिवराज गायकवाड, सहायक गटविकास अधिकारी नीलेश जाधव, दोडामार्गचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, गटशिक्षणाधिकारी निसार नदाफ, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक भाई परमेकर, बाबूराव धुरी, अंकुश जाधव, लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या हस्ते झाले.

गोव्यातील पर्यावरण अभ्यासक रमेश गावस म्हणाले की, दोडामार्गचा इतिहास, भूगोल, कला, साहित्य, शिक्षण, नद्या, नाले, डोंगर, जंगल, प्राणी, पक्षी आणि मानवी समूहांचा संशोधनात्मक अभ्यास करून हे पुस्तक तयार केले आहे. त्यामुळे ते घराघरांत आणि प्रत्येक विद्यार्थी, कर्मचाऱ्यांच्या हातात असले पाहिजे, असे सांगितले. यावेळी शिवराज गायकवाड, नीलेश जाधव, ऋषिकेश अधिकारी, निसार नदाफ, भाई परमेकर, बाबूराव धुरी, अंकुश जाधव यांनीही या पुस्तकाचे महत्त्व विशद केले. यावेळी बाबूराव धुरी यांनी २०० पुस्तक खरेदी करून गावागावातील कार्यकर्त्यांना वाटणार असल्याची घोषणा केली.

## हे पुस्तक लोकांपर्यंत गेले पाहिजे : सुभाष सावंत

डॉ. सुभाष सावंत म्हणाले की, दोडामार्गला निसर्गाने भरभरून दिले आहे. त्यामुळे इको-टुरिझम, निसर्ग पर्यटन, ॲडव्हेंचर टुरिझम, हिल फेस्टिव्हल, जंगल पर्यटन याला मोठी संधी आहे. त्यासाठी या पुस्तकाचा उपयोग होणार आहे. हे पुस्तक लोकांपर्यंत गेले पाहिजे, असे सावंत म्हणाले. सूत्रसंचालन संप्रिवी कशाळीकर यांनी केले, तर आभार सूचन कोरगावकर यांनी मानले.